22 MAR 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या स्थानी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. सोनिपत (हरयाणा) येथील दिनबंधू छोटूराम अभियांत्रिकी आणि तंत्र विद्यापीठात झालेल्या या स्पर्धेचे बक्षीस वितरण कुलगुरू डॉ. रजनी आणायत यांच्या हस्ते झाले.

अठरा वर्षांनंतर पहिल्यांदाच साखळी फेरीसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ पात्र ठरला होता. पहिल्या सामन्यात दिल्ली विद्यापीठाचा ८ - ३ असा एकतर्फी पराभव केला. दुसरा साखळी सामना, मात्र अटीतटीचा झाला. कालिकत विद्यापीठाने हा सामना ७ - ५ असा जिंकला. शेवटच्या सामन्यात यजमान सोनीपत संघाविरुद्ध पंचांच्या चुकीच्या निर्णयांचा फटका शिवाजी विद्यापीठ संघाला बसला. त्यामुळे एक धावेने पराभूत व्हावे लागले. या संघात स्वप्नाली वायदंडे, ऐश्वर्या पुरी, करिष्मा कुडचे, वाणी ताटी, साक्षी भेंडिगिरी, निशा आईवळे, स्नेहल पाटोळे, मैथिली पाटील, सायली सावंत, दीपाली कराडे, सुजाता थोरवडे, राणी सोळवंडे, वैष्णवी मोहिते, पल्लवी कांबळे, प्रशिक्षक ज्योती डवाळे, संघ व्यवस्थापक डॉ. बाबासाहेब उलपे यांचा समावेश होता.

लोकमत



शिवाजी विद्यापीठामार्फत पुरुष विभागात के -२ कयाकिंग या दोनशे मीटर पुरुष गटातील स्पर्धेत दर्शन पोवार, श्रेयांश पाटील, करण घुणके, कौस्तुभ पोकार्डे यांनी कांस्यपदक मिळविले.

# शिवाजी विद्यापीठाचे अखिल भारतीय कयाकिंग स्पर्धेत यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ऑल इंडिया असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी व पंजाब युनिव्हर्सिटी, चंदीगड यांच्या विद्यमाने चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय महिला आणि पुरुष विभागातील कयाकिंग, कनोईंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला आणि पुरुष संघाने नेत्रदीपक यश मिळविले. या स्पर्धा १४ ते १८ मार्च या कालावधीत घेण्यात आल्या.

शिवाजी विद्यापीठामार्फत पुरुष विभागात के-२ कयाकिंग या दोनशे मीटर स्पर्धेत करण घुणके, पवन कोळी यांनी रौप्यपदक प्राप्त केले, तर के-४ कयाकिंग या दोनशे मीटर पुरुष गटातील स्पर्धेत दर्शन पोवार, श्रेयांश पाटील, करण घुणके, कौस्तुभ पोकार्डे (सर्व डीकेएसी इचलकरंजी) यांनी कांस्यपदक मिळविले. शिवाजी विद्यापीठामार्फत के-४ कयाकिंग या दोनशे मीटर महिला स्पर्धा गटामध्ये शालिनी पिष्टे, (डी. वाय. पाटील कॉलेज), राजनंदिनी पाटील (केआयटी कॉलेज), निकिता पिष्टे (डी. आर. माने कॉलेज) आणि श्रावणी विठ्ठल हाळीजवाले (विवेकानंद कॉलेज) यांनी कांस्यपदक मिळविले. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

22 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ बनले 'पाणी'दार

## जमिनीवर ३२ कोटी लिटर पाणीसाठा; राज्यातील एकमेव जलसमृद्ध विद्यापीठ





**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भविष्यातील पाण्याचे संकट ओळखून शिवाजी विद्यापीठाने जमिनीवर ३२ कोटी लिटर पाणीसाठा केला आहे. जलसमृद्ध असणारे 'पाणी'दार शिवाजी विद्यापीठ राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे.

**जागतिक जलदिन विशेष**

विद्यापीठास ८५३ एकरांचा परिसर लाभला आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपूर्वी परिसरात राजाराम तलाव बांधला आहे. तेथून विद्यापीठ वापरासाठी पाणी घेऊ लागले. विद्यापीठाचा विस्तार वाढल्यानंतर महापालिकेकडून पाणी घ्यायला सुरुवात झाली. यासाठी दर महिन्याला ८ लाख रुपये याप्रमाणे वर्षाचे ९६ लाख रुपये खर्च करावे लागत होते.

> शाश्वत विकासाठी जल, जंगल व जमीन यांचा समन्वय साधणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने जलसंचय करून विद्यापीठ स्वयंपूर्ण बनले आहे. भौगोलिक रचनेप्रमाणे समाजासाठी उपयुक्त ठरत आहे. विद्यापीठ जलसिंचनाचे विविध उपक्रम राबवित असून पावसाच्या पाण्याचा एकही थेंब वाहून जाऊ नये, यासाठी प्रयत्न करीत आहे.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे,** प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

आजघडीला विद्यापीठात २ तलाव, २३ शेततळी, १० विहिरींमध्ये दरवर्षी पावसाचे पाणी साठविले जाते. काही गेल्या वर्षात विद्यापीठाच्या पाणी साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

गेल्या आठ वर्षांत विद्यापीठ परिसरात सुमारे ३० हजारांहून अधिक विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. सध्या ३२ कोटी लिटर पाणी विद्यापीठात साठविले जात आहे. वेस्ट वॉटरवर २०० नारळ झाडांची बाग फुलली आहे. घाणपाणी स्वच्छ पाण्यात मिसळू नये यासाठी त्यावर प्रक्रिया केली जाते. यासाठी पाच सांडपाणी प्रकल्प उभारले असून विद्यापीठातील उद्याने फुलवली जात आहेत.

पुढारी

# इलेक्टोरल लिटरसी क्लब स्थापन करण्यासाठी प्रयत्न करावेत : देशपांडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सजग मतदार निर्माण करण्याच्या दृष्टीने विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांनी अभ्यासक्रम निर्मितीसह विविध उपक्रम राबवावेत. शिवाजी विद्यापीठाने यापुढील काळात कृतिशील भूमिका घेत स्थानिक चौकशी समित्यांच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांत इलेक्टोरल लिटरसी क्लब तथा डेमॉक्रसी क्लब स्थापन करण्याच्या प्रक्रियेला चालना द्यावी, अशी अपेक्षा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी व्यक्त केली.

देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठास सोमवारी सदिच्छा भेट दिली. निवडणूक प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने कोणते उपक्रम राबविता येतील, या दृष्टीने त्यांनी चाचपणी केली. देशपांडे म्हणाले, विद्यार्थीदशेपासून निवडणूक प्रक्रियेची माहिती व्हावी, या उद्देशाने विद्यापीठांकडून निवडणूक आयोगाच्या खूप अपेक्षा आहेत. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम आगामी शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित होईल, या दृष्टीने प्रयत्न करावेत. हा अभ्यासक्रम सैद्धांतिक व कृतिशील उपक्रमांवर भर देणारा असावा, याचीही दक्षता घ्यावी.

पुण्यनगरी

# शिबिरातून प्रेरणा : प्रा. जायभाये

**सुळे : प्रतिनिधी**

श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून निश्चितच युवकांना प्रेरणा मिळते, यातूनच संस्कारक्षम पिढी घडते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक प्रा. अभय जायभाये यांनी केले. सावर्डे, ता. पन्हाळा येथे के.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय आयोजित रा. से.यो. श्रमसंस्कार शिबिरात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच भाग्यश्री बच्चे होत्या.

या सात दिवसांच्या शिबिरात गावातील महिला, पुरुष, लहान मुले, तरुणवर्ग यांच्यासाठी विविध प्रकारच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, साजिद हुदली, दीपक चौगुले, डॉ. एम. एम. मुजुमदार, डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी यांचे सहकार्य लाभले. शिबिरप्रमुख रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमित वैद्य, प्रा. अरुण देसाई, प्रा. वसुंधरा लवंगारे, सुमित वैद्य यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक सौरभ पाटील, सूत्रसंचालन प्रियंका फडतरे यांनी केले. आभार श्रद्धा पाटील यांनी मानले. उपसरपंच दीपाली पाटील, ग्रा.पं. सदस्य, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुण्यनगरी

# 'नेटवर्क २४/७' प्रथम

## राज्य नाट्य स्पर्धेचा निकाल जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित ६० व्या हौशी राज्य नाट्य स्पर्धेत कोल्हापूर केंद्रातून मेरीड (इंडिया) संस्थेच्या 'नेटवर्क २४/७' या नाटकाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून, शिवाजी विद्यापीठाच्या संगीत-नाट्यशास्त्र विभागाच्या 'अंधायुग' या नाटकाने द्वितीय क्रमांक पटकावला. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे.

कोल्हापूर केंद्रावरील निकालामध्ये युवक मित्र मंडळ संस्थेच्या 'गगन दमामा बाज्यो' नाटकाला तृतीय पारितोषिक मिळाले. विभागनिहाय अनुक्रमे विजेते- उत्कृष्ट दिग्दर्शन : विद्यासाागर अध्यापक (नेटवर्क २४/७), ज्ञानेश मुळे (अंधायुग), प्रकाश योजना : आशीष भागवत (नेटवर्क २४/७), संजय तोडकर (अंधायुग), नेपथ्य : प्रकाश पाटील, ओंकार पाटील. रंगभूषा : ओंकार पाटील, विजयालक्ष्मी कुंभार. अजय इंगवले, आदिती देशपांडे, गुणवत्ता प्रमाणपत्रे- प्रवीण पाटील, मीना पोतदार-तहसीलदार, उज्ज्वला खांडेकर, आसावरी नागवेकर, रितीक राजे, सुबोध गद्रे, सतीश तांदळे, राजन जोशी, प्रसाद जमदग्नी, आदित्य कुंभार यांना अभिनयाचे रौप्यपदक प्राप्त झाले आहे. स्पर्धेत एकूण २२ नाट्यप्रयोग सादर झाली होती.

सकाळ

# प्रत्येक महाविद्यालयात मतदार साक्षरता कक्ष

## श्रीकांत देशपांडे; शिवाजी विद्यापीठाला भेट

कोल्हापूर, ता. २१ : प्रत्येक महाविद्यालयात मतदार साक्षरता कक्ष (इलेक्टोरल लिटरसी क्लब) स्थापण्यासाठी हालचाली कराव्यात, अशी सूचना मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी आज येथे केली. शिवाजी विद्यापीठाच्या सदिच्छा भेटी प्रसंगी ते बोलत होते. निवडणूक प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी कोणते उपक्रम राबविता येतील, या दृष्टीने त्यांनी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याशी संवाद साधला.

श्री. देशपांडे म्हणाले, "विद्यार्थिदशेपासून निवडणूक प्रक्रियेची माहिती व्हावी, या उद्देशाने विद्यापीठीय व्यवस्थेकडून निवडणूक आयोगाच्या मोठ्या अपेक्षा आहेत. त्या दृष्टीने विद्यापीठाने दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम आगामी शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित होईल. अभ्यासक्रम मोजका सैद्धांतिक आणि अधिकाधिक कृतीशील उपक्रमांवर भर देणारा असावा, याचीही दक्षता घ्यावी. अभ्यासक्रम तयार झाल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या माध्यमातून विद्यापीठांतही हा अभ्यासक्रम लागू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील."

डॉ. आर. व्ही. गुरव यांनी विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून घेतलेले परिसंवाद व विविध स्पर्धा यांची माहिती दिली. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उप जिल्हा निडणूक अधिकारी भगवान कांबळे, प्रांताधिकारी अमित माळी, डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये उपस्थित होते.

सकाळ

# 'नेटवर्क २४ बाय ७' प्रथम

## अंधायुग दुसरे, 'गगन दमामा' तिसरे

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २१ : साठाव्या राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत कोल्हापूर केंद्रातून मेरिड (इंडिया) संस्थेच्या 'नेटवर्क २४ बाय ७' या नाटकाने पाच वैयक्तिक पारितोषिकांसह पहिला क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या 'अंधायुग' नाटकाने चार वैयक्तिक पारितोषिकांसह दुसरा क्रमांक पटकावला. दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली. दरम्यान, युवक मित्रमंडळाच्या 'गगन दमामा बाज्यो' या नाटकाने तिसरा क्रमांक पटकावला. दरम्यान, २३ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात झालेल्या स्पर्धेत एकूण २२ नाट्यप्रयोग सादर झाले. परीक्षक म्हणून देवीदास आमोणकर, राजेंद्र पाटणकर आणि सुहास खंडारे यांनी काम पाहिले.

### सविस्तर निकाल असा :

- **दिग्दर्शन** : प्रथम पारितोषिक : विद्यासागर अध्यापक (नेटवर्क २४/७), द्वितीय : ज्ञानेश मुळे (अंधायुग)
- **प्रकाश योजना** : प्रथम : आशिष भागवत (नेटवर्क २४/७), द्वितीय : संजय तोडकर (अंधायुग)
- **नेपथ्य** : प्रथम : प्रकाश पाटील (नेटवर्क २४/७), द्वितीय : ओंकार पाटील (अंधायुग)
- **रंगभूषा** : प्रथम : ओंकार पाटील (अंधायुग), द्वितीय : विजयालक्ष्मी कुंभार (गगन दमामा बाज्यो)

उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक : अजय इंगवले (अंधायुग) व आदिती देशपांडे (कातळडोह).

- **अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे**- प्रणवी पाटील (चांगुणा), मीना पोतदार- ताशिलदार (नॉर्थ पोल साऊथ पोल), उज्ज्वला खांडेकर (नेटवर्क २४/७), आसावरी नागवेकर (उत्तररामचरित), रितीका राजे (सुलतान रजिया), सुबोध गद्रे (स.न.वि.वि.), सतीश तांदळे (गगन दमामा बाज्यो), राजन जोशी (नेटवर्क २४/७), प्रसाद जमदग्नी (नॉर्थ पोल साऊथ पोल), आदित्य कुंभार (कातळडोह).

सकाळ

# 'दास्तांगोई' माणसांच्या गोष्टी सांगणारा : अक्षय शिंपी

कोल्हापूर, ता. २१ : 'दास्तांगोई' हा ऊर्दू कला प्रकार माणसांच्या गोष्टी सांगणारा आहे. त्यात कोणताही कालक्रमिक इतिहास नाही. पण, माणसांच्या, शहरांच्या, गोष्टी, किस्से सांगणारा हा कलाप्रकार आहे, असे प्रतिपादन अभिनेते अक्षय शिंपी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात दास्तांगोई ऊर्दु कलाप्रकाराविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिंपी यांनी दास्तांगोई ऊर्दू कलाप्रकाराचा प्रारंभ, त्याचे भारतीय कलाविश्वातील स्थान, विकास आणि महत्त्व सांगितले. धनश्री खंडकर यांनी 'दास्तां ए बडी बाका' प्रयोगाच्या निर्मिती प्रक्रियेविषयी विवेचन केले. या प्रसंगी प्रयोगातील प्रसंगाचे सादरीकरणही केले. प्रा. नंदकुमार मोरे, दत्ता देसाई उपस्थित होते. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुष्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

22 MAR 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# महाविद्यालयांमध्ये मतदार साक्षरता कक्ष स्थापन करा

## मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांचे निर्देश : शिवाजी विद्यापीठ प्रशासनासोबत बैठक

प्रतिनिधी
कोल्हापूर

सजग मतदार निर्मितीसाठी विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांनी अभ्यासक्रम निर्मितीसह विविध उपक्रम राबवावेत, त्याचबरोबर प्रत्येक महाविद्यालयांमध्ये मतदार साक्षरता कक्ष स्थापन करावेत, असे निर्देश राज्य मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी सोमवारी येथे दिले. तसेच राज्यात शक्य असेल तेथे जिल्हास्तरीय इलेक्शन म्युझियम स्थापन करण्याचाही गांभिर्याने विचार सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठ येथे निवडणूक प्रक्रियेमध्ये युवकांचा सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने कोणते उपक्रम राबविता येतील, या दृष्टीने चाचपणी करण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे, पन्हाळा प्रांताधिकारी अमित माळी, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे सोमवारी आयोजित बैठकीत राज्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी आढावा घेतला. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.**

ते पुढे म्हणाले, विद्यापीठाने स्थानिक चौकशी समित्यांच्या माध्यमातून महाविद्यालयांतून इलेक्टोरल लिटरसी क्लब किंवा डेमॉक्रसी क्लब स्थापन करावेत. राज्य निवडणूक आयोग आणि विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक पातळीवर संयुक्तिक विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात यावे.

यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाकडून निवडणूक प्रक्रिया व मतदार जागृतीच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

22 MAR 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य नाट्य स्पर्धेत कोल्हापूर केंद्रावर 'नेटवर्क २४/७' प्रथम

## महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून निकाल जाहीर : विद्यापीठच्या 'अंधायुग'चा व्दितीय क्रमांक

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून घेण्यात आलेल्या ६० व्या राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत कोल्हापूर केंद्रावर कोल्हापुरातील मेरीड इंडिया या संस्थेच्या 'नेटवर्क २४/७' नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

तर शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या 'अंधायुग'या नाटकाने व्दितीय क्रमांक पटकावला आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. या दोन्ही नाटकातील कलाकारांनी गुलालाची उधळण करीत आनंदोत्सव साजरा केला.



**कोल्हापूर : राज्य नाट्य हौसी स्पर्धेत कोल्हापूर केंद्रावर प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर अंतिम फेरीत निवड झाल्यानंतर आनंदोत्सव साजरा करताना 'नेटवर्क २४/७' नाटकातील कलाकार.**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून कोल्हापूर केंद्रावर २३ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत राज्य हौशी नाट्यस्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत २२ संस्थांनी आपले नाट्यप्रयोग सादर केले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सर्वश्री आमोणकर, राजेंद्र पाटणकर, सुहास खंडारे यांनी काम पाहिले. सर्व पारितोषिक विजेत्यांचे सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी अभिनंदन केले. कोल्हापूर केंद्रावर झालेल्या प्रथम फेरीत कोल्हापुरातील युवक मित्र मंडळ संस्थेच्या 'गगन दमामा बाज्यो' या नाटकाने तृतीय क्रमांक पटकावला. दिग्दर्शन: प्रथम पारितोषिक विद्यासागर अध्यापक (नाटक–नेटवर्क २४/७), व्दितीय पारितोषिक ज्ञानेश मुळे (नाटक–अंधायुग), प्रकाश योजना : प्रथम पारितोषिक आशिष भागवत (नाटक– नेटर्क २४/७), व्दितीय पारितोषिक संजय तोडकर (नाटक–अंधायुग),

नेपथ्य : प्रथम पारितोषिक प्रकाश पाटील (नाटक–नेटवर्क २४/७), व्दितीय पारितोषिक ओंकार पाटील (नाटक–अंधायुग), रंगभूषा : प्रथम पारितोषिक ओंकार फाटील (नाटक–अंधायुग), व्दितीय पारितोषिक विजयालक्ष्मी कुंभार (नाटक– गगन दमामा बाज्यो), उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक : अजय इंगवले (नाटक–अंधायुग) व आदिती देशपांडे (नाटक–कातळडोह),

अभिनयसाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे : प्रवीण पाटील (नाटक–चांगुलपणा), मीना पोतदार ताशिलदार (नाटक–नॉर्थ पोल साऊथ पोल), उज्वल्ला खांडेकर (नाटक–नेटवर्क २४/७), आसावरी निगवेकर (नाटक–उत्तरामचरित), रितीक राजे (नाटक–सुलतान रजिया), सुबोध गद्रे (नाटक–स. न. वि. वि.), सतीश तांदळे (नाटक–गगन दमामा बाज्यो), राजन जोशी (नाटक–नेटवर्क २४/७), प्रसाद जमदग्नी (नाटक–नॉर्थ फोल साऊथ पोल), आदित्य कुंभार (नाटक–कातळडोह).

तरुण भारत

# आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत शिवानी कुलकर्णीला कास्यपदक

**मुरगूड :** मंगलूर (मोडबिद्रि) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिलांच्या क्रॉसकंट्री स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला क्रॉस कंटी संघाने कास्य पदक पटकावले. या संघातून सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या शिवानी कुलकर्णी हिने प्रतिनिधित्व केले होते. या यशाबद्दल तिचा प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. शिवाजी पोवार, डॉ. ए. जी. मगदूम, डॉ. माणिक पाटील, दिलीपराव कांबळे, प्रा. पी. आर. आर. फराकटे, राजू मंडलिक, सुमीत जाधव उपस्थित होते. तिला डॉ. शिवाजी पोवार, रामदास फराकटे, संभाजी कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. संस्था सेक्रेटरी खासदार संजय मंडलिक, कार्याध्यक्ष अँड. विरेंद्र मंडलिक, कार्यवाह आण्णासाहेब थोरवत यांचे प्रोत्साहन मिळाले.